**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

# परिपत्रक

**विषय :-** सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन अतिरिक्त तुकडयांना मंजुरी देण्याबाबतची जलदगती कार्यपध्दती आणि त्या संबंधीचे निकष विहित केल्यानुसार प्रस्ताव सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(१२८/१७) मशि-४ दिनांक ०४ जूलै,२०१७.

**महोदय,**

वरील संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (८) मध्ये असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्याची तरतूदीच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित केलेले आहे.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन जलदगती अतिरिक्त तुकडयांना तात्पुरत्या स्वरुपात मान्यता देण्याकरीता शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दती व निकष विहित केल्याप्रमाणे **दिनांक १०-०७-२०१९** पर्यंत www.bamu.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation Portal मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यामध्ये सर्व दस्तऐवजांसह नस्ती अनुक्रमित करुन विहित केलेल्या शुल्क कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे नांवे **बँक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र. 60145330323) किंवा** बँक ऑफ महाराष्ट्र शाखा क्र. 152, **IFSC Code No. MAHB0000152** येथील (खाते क्र. **60145330323**) या क्रमांकावर आर.टी.जी.एस. (**R.T.G.S.**) द्वारे जमा करुन चलनाची प्रत प्रस्तावासोबत जोडून विद्यापीठाच्या लेखा विभागाद्वारे तपासुन घ्यावे व "कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" यांच्याकडे सादर करावे यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ २०१६ आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासनाचे निर्णय / आदेश सर्व संबंधीतांवर बंधनकारक असेल.

विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेत स्थळावर **शासनाने विहित केलेल्या अर्जाचा नमुना " परिशिष्ट - अ " Mangal font (Unicode) मध्ये टंकलिखित करुन तीन प्रती आणि DVD मध्ये Soft Copy व PDF फाईल करुन विद्यापीठात विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावा.** या करीताचे शुल्क शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या बृहत आराखडयातील अध्यादेश -१५१ मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील.

परिशिष्ट-"अ" अतिरिक्त जलदगती तुकडीकरीता अर्जाचा नमूना, परिशिष्ट-"ब" मध्ये विहित केलेल्या सर्व बाबींची पुर्तता करावी, प्रस्ताव अपूर्ण असल्यास त्याची जबाबदारी संबधीत प्राचार्यांची राहिल.

कृपया विहित केलेल्या पध्दतीने व विहित मुदतीमध्ये प्रस्ताव सादर करावा.

**( टिप :- शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त झालेली जलदगती अतिरिक्त तुकडी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तात्पुरत्या स्वरुपात मान्य राहील, सदर तुकडी नियमित करण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षासाठी बृहत आराखडयामध्ये विहित केलेल्या मुदतीत स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. जलदगती पध्दतीने मान्यता दिलेली अतिरिक्त तुकडी नैसर्गिक वाढीने पुढे चालू राहील. मात्र अशा तुकडीस पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नियमित शासन मान्यता प्राप्त न झाल्यास सदर तुकडीमध्ये प्रथम वर्षाकरीता विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही.)**

*संदर्भ क्रमांक : शैक्ष / संलग्न/ आरएम/ २०१९-२०/०८*
*दिनांक- ०१-०७-२०१९*

*
*
*
R

स्वाक्ष/-
**कुलसचिव**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**